# 'स्वरचित' - काव्य स्पर्धा

---

- कवितेचे शीर्षक : - स्वरचित
- कवी / कवयित्रीचे नाव :- सौ. शुभदा जोशी

---

येतो ओंकाराचा नाद
निसर्गाच्या कुशीतूनी
लक्ष देऊ ऐकू साद
हृदयाच्या तळातूनी

अंतर्नाद हृदयाचा
मन तरल ठेवूनी
साधू संवाद मनाशी
वादी संवादी होऊनी

ताल तालात मिसळू
मैत्री स्वरांशी करूनी
अनाहत ऐकू, घेऊ
सुख ओंजळ भरूनी

या, सा रे ग म प ध नी
साद घालूनी स्वरांना
देता येईल आतूनी
मोकळीक भावनांना

ऐकू शास्त्रीय संगीत
स्वरांनांही आळवूया
स्नान वाद्य, संगीताने,
चक्र योग्य जागवूया

साधु सकारात्मकता
येऊनीया समेवरी
स्थान संगीतास देता
मिळे जीवना उभारी

Anahat Music Therapy